तरुण भारत संवाद गुरुवार, १६ ऑक्टोबर २०२५



आजरा : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या २९ व्या वर्धापनदिनी उपस्थित मान्यवर.

# समाजाची प्रगती हेच 'रवळनाथ'चे ध्येय

- मीना रिंगणे यांचे प्रतिपादन
- रवळनाथ हौसिंग फायनान्सचा आजरा शाखेचा वर्धापन

**प्रतिनिधी**
आजरा

रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी सामाजिक हित केंद्रस्थानी ठेवून वाटचाल करीत आहे. सामाजिक हित हेच संस्थेचे ध्येय असल्याचे मत रवळनाथच्या उपाध्यक्षा मीना रिंगणे यांनी व्यक्त केले. संस्थेच्या आजरा शाखेच्या २९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. संचालक प्रा. व्ही. के. मायदेव, आजरा शाखा चेअरमन डॉ. विनायक आजगेकर, डॉ. शिवशंकर उपासे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शिवशंकर उपासे म्हणाले, ग्रामीण भागातून सुरु झालेली संस्था आज आपल्या कार्यातून देशभर पोहचली आहे. केवळ शाखांचा विस्तार न करता प्रत्येक शाखा प्रगती कशी करेल याकडे विशेष लक्ष दिले जाते. बँकिग व्यवसाय आणि सामाजिक बांधिलकी याचे व्रत जपल्यामुळे सहकारात संस्थेला लोकमान्यता मिळाल्याचे सांगितले.

यावेळी संचालक प्रा. मायदेव, महेश मजती, विजय आरबोळे, सभासद गुरु गोवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. चेअरमन डॉ. आजगेकर यांना प्रास्ताविक केले, शाखा सल्लागार सुरेखा भालेराव यांनी सुत्रसंचालन केले. सीईओ डी. के. मायदेव यांनी आभार मानले.